# उत्तम पुस्तकं कुठे मिळतात?

पुण्याच्या डेक्कन जिमखाना या अतिशय महत्त्वाच्या ठिकाणी गेली ७५ वर्षांपेक्षा अधिक वर्षे चालू असलेले 'इंटरनॅशनल बुक सर्व्हिस' आता नामविस्तार करून नव्या स्वरूपात आले आहे. 'बुकगंगा इंटरनॅशनल बुक सर्व्हिस' या नावाने आता त्याची ओळख असणार आहे. इंटरनॅशनल बंद पडले असते तर तो अनेकांना धक्का बसला असता, आता काही आशा, अपेक्षांसह इंटरनॅशनलकडे आपण पाहत आहोत.

सध्या पुस्तकांची अनेक दुकाने बंद पडत चालली आहेत, काही नव्याने सुरू होत आहेत, काहींनी अत्याधुनिक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व गोष्टींची चर्चा होत आहे. त्यांची नोंदही घेतली जात आहे.

या पार्श्वभूमीवर अशा पुस्तक विक्रेत्यांचा-दुकानांचा उल्लेख मुद्दाम करावा वाटतो, त्यांना ना नाव, ना चेहरा; परंतु निवडक पुस्तकवेड्यांचे ते माहेरघर असते. ही पुस्तके उपलब्ध करून देणारी ठिकाणे म्हणजे फुटपाथवरील पुस्तकविक्रेते. अनेक दुर्मिळ ग्रंथ, कागदपत्रे, पत्रव्यवहार अशा फुटपाथवरील विक्रेत्यांनी चोखंदळ पुस्तकप्रेमींना, अभ्यासकांना, संशोधकांना उपलब्ध करून दिला. अशा दुर्मिळ ग्रंथांचे संदर्भमूल्य लक्षात घेता, खरं तर तो सांस्कृतिक खजिनाच असतो, हा खजिना आपल्याला मिळावा यासाठी कितीतरी अभ्यासू लोक अशा फुटपाथवरील दुकानावर रमत असतात. विक्रेत्याशी सलगी करत असतात. वाया जाणारा मोठा बौद्धिक, सांस्कृतिक ऐवज येथे अशा प्रकारे प्राप्त होत असतो, जतन होत असतो.

साधारणतः ८-१० वर्षांपूर्वीची गोष्ट 'वर्ल्ड बुक फेअर'मध्ये आम्ही काही जण माया प्रकाशनच्या मोठ्या स्टॉलमध्ये त्याचे मालक सुमित मित्रा यांच्याशी गप्पा मारत बसलो होतो. बोलण्याच्या ओघात मी सुमित मित्रांना विचारले, ''अच्छी किताबें कहाँ मिलती हैं?'' माझा प्रश्न ऐकून त्या स्टॉलमध्ये पुस्तके चाळणारे एक वयोवृद्ध ग्राहक आमच्या टेबलाकडे आले आणि कमरेवर दोन्ही हात ठेवत म्हणाले, ''भाई, अच्छी किताबें तो फुटपाथ पर मिलती हैं। ... वहाँ दरियाँ गजके फुटपाथ पर।'' अर्थातच त्यांच्याशी सगळेच सहमत झाले. त्या चर्चेतून स्फूर्ती घेऊन दरियागंज आणि त्याच्या बाजूच्या रस्त्यावर रविवारी भल्या सकाळी ६ वाजताच गेलो. दाट धुके आणि थंडीने गोठलेल्या वातावरणात बॅटऱ्या आणि गाड्यांचे दिवे फक्त दिसत होते. अशा अस्पष्ट धुसर सकाळी फुटपाथवर पुस्तकांचा पसारा मांडून बसलेल्या दुकानदाराचा व ग्राहकांचा संवाद कानावर आला - पुस्तकांच्या किमतीवरून त्यांच्यामध्ये खळखळ चालू होती. चिडून विक्रेता म्हणाला, ''कोई पंडितजी आएगा, तो वो मुँहमाँगे दाम देगा, संतोष के साथ ले जाएगा, आपको इसका मूल्य समझता नहीं, जाओ, सुबह का टाइम खराब मत करो. मेरे यहाँ केवळ पंडित लोग आते हैं'' त्याने समोरच्या माणसाचा नक्शाच उतरवला होता. शिवाय आपला संपर्क व संवाद फक्त बुद्धिमान, स्कॉलर्स लोकांबरोबरच होऊ शकतो, हे त्याने ठासून सांगितले.

फुटपाथवरील विक्रेता झाला, तरी अशा काही विक्रेत्यांना ही प्रतिष्ठा प्राप्त झाली होती, ती त्यांच्याकडे असणाऱ्या दुर्मिळ पुस्तकांमुळे, अशी पुस्तके मिळविण्यासाठी हे विक्रेते खूप धावाधाव करीत असतात. शोध घेत असतात, त्यांचे काम सोपे नसते.

फुटपाथवरील अशा पुस्तकविक्रेत्यांना आपण सन्मान द्यायला हवा. पुण्यातील जाणकार ग्रंथप्रेमी मंडळी वसंत आठवले, काटकर, ढमढेरे, गाजरे, पलटणवाले अशा पुस्तकविक्रेत्यांची नावे व आठवणी सांगतातच, अशी मंडळी अनेक शहरांत असतात. कोलकताचे 'कॉलेज स्ट्रीट' सेकंड हँड हे दुकान किंवा ६-७ वर्षांपूर्वी बंद पडलेले काळबादेवी, मुंबई येथील 'न्यू अँड सेकंड हँड बुक' आणि त्याचे मालक मानकामे किंवा मेट्रो सिनेमासमोरचे 'कोकिळ अँड सन्स' याचा उल्लेख करता येईल. काळाच्या ओघात ही माणसे थकत गेली, अशा पुस्तकांचे ग्राहक अत्यल्प झाले आणि रोजचा खर्च भागवणे त्याहून अवघड बनले. फुटपाथवर अशा 'अच्छी किताबे' विकणाऱ्यांची चर्चा आपण मोठ्या बुक शॉपच्या दुकानांप्रमाणेच करायला हवी. त्यांची निष्ठा, ग्रंथप्रेम लक्षात घ्यायला हवे. ग्रंथव्यवहारात हा घटक उपेक्षितच राहिला, त्यांचे योगदान लक्षात घ्यायलाच हवे.

इंटरनॅशनलमधील पराडकर यांच्याबरोबरच्या गप्पांतूनही खूप गोष्टी समजायच्या. रविवारी ते दुकानाबाहेर पुस्तके विकायला बसायचे. फुटपाथवर पुस्तके विकता विकता मोठे प्रकाशक झालेले सु. वा. जोशी हेही गौरवास पात्र आहेतच. त्यांच्या या श्रमाचा, जिद्दीचा गौरव मराठी प्रकाशक परिषदेने प्रकाशकांच्या संमेलनाचे अध्यक्षपद देऊन केला. फुटपाथवरील हा पुस्तकांचा बाजार आता मात्र बदनाम होत चालला आहे. पायरेटेड पुस्तकांची विक्री ही क्रिमिनल गोष्ट आहे. फुटपाथ व्यापणाऱ्या या गुन्हेगारांना मात्र कोणी शिक्षा देत नाही.

**– अरुण जाखडे**

